# ॥ चाणक्य मंडल परिवार ॥

जिथे लोकसेवा हीच देशसेवा

# फाउंडेशन कोर्स

## Chanakya Mandal Pariwar's FLAGSHIP COURSE

### चाणक्य मंडल परिवारचा सर्वात महत्त्वाचा कोर्स

MANAGEMENT
SKILLS
TEAMWORK
YOGA
MEDITATION
DECISION MAKING
PROBLEM SOLVING
COMMUNICATION






LEADERSHIP
CREATIVITY
PRODUCTIVITY
HABIT BUILDING
CHARACTER BUILDING
PERSONALITY DEVELOPEMENT

**श्री. अविनाश धर्माधिकारी (IAS)**

संस्थापक, संचालक- चाणक्य मंडल परिवार

**प्रशासनासहित जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या उत्तमता आणि प्रतिभेचा ठसा उमटवून जे भारत मातेची सेवा करतील अशा युवा पिढीसाठी...**

## अधिष्ठानची सूत्रं

**विचारांची त्रिसूत्री**
- स्वतःला ओळख
- स्वतःला ओळखून आयुष्यातील क्षेत्र निवड
- निवडलेल्या क्षेत्रात उत्तमता आणि प्रतिभा गाठ

**कृतीची त्रिसूत्री**
- स्वाध्याय
- योग
- कार्य संस्कृती

नमस्ते,

चाणक्य मंडल परिवारचा सर्वात महत्वाचा कोर्स, असं मी फाउंडेशन कोर्सचं वर्णन करतो. शैक्षणिक क्षेत्राला आपण दिलेलं हे योगदान आहे. आधी तू स्वतःला ओळख, या 'स्व'च्या ओळखीनंतर सुसंगत करिअरची निवड, आणि निवडलेल्या क्षेत्रात उत्तमता आणि प्रतिभेचा ध्यास घेणं – म्हणजे फाउंडेशन कोर्स.

बदलत्या जगाच्या गरजा लक्षात घेता अनेक नवनवीन कौशल्यांचा समावेश आपण फाउंडेशन कोर्समध्ये केला आहे. अभ्यास कौशल्य, संभाषण कौशल्य, व्यवस्थापन कौशल्ये इथपासून ते इंडस्ट्री ४.०, शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य, आर्थिक साक्षरता अशा अनेक तंत्र-कौशल्यांचं प्रशिक्षण आपण या कोर्समध्ये देतो.

फाउंडेशन कोर्समार्फत गुणवत्ता, प्रतिभा, चारित्र्य आणि कर्तृत्व विकसित होण्यासाठी शुभेच्छा.

सर्वांनाच सर्वकाळ सर्व शुभेच्छा!

**स्पर्धा परीक्षेसहित आयुष्याच्या कुठल्याही क्षेत्रात उपयुक्त असलेली कौशल्ये शिकवणारा कोर्स**






*Genius = (Excellence x Creativity)$^n$*

**श्री. अविनाश धर्माधिकारी सर**

माजी सनदी अधिकारी,
संस्थापक, संचालक- चाणक्य मंडल परिवार

"अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।
विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ।।"
-श्रीमद्भगवद्गीता


# या कोर्समध्ये शिकवली जाणारी विविध कौशल्ये



# फाउंडेशन कोर्सची प्रमुख वैशिष्ट्ये

## 'स्व' ची ओळख :

जीवनामध्ये यशाकडे जाण्याचे अनेक मार्ग आहेत. केवळ इंजीनियरिंग मेडिकल करणे म्हणजेच यश नव्हे. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा कल ओळखून तुमचं डोकं कुठे चालतं या मार्गाने जायला शिकवणारा कोर्स.





**अहम् ब्रह्मास्मि-**
**'तत् त्वं असि'**

> *" Children must be taught how to think not what to think.."*

## अभ्यास कौशल्ये:

आजकालच्या वेगाने बदलणाऱ्या जगामध्ये सतत नवीन कौशल्ये शिकत राहणं आवश्यक आहे. शाळा आपल्याला काय शिकायचं सांगते, कसं शिकायचं सांगत नाही–ते आम्ही करतो. कुठलाही विषय शून्यातून स्वतःचा स्वतः शिकून घेणे म्हणजे स्वाध्याय कौशल्ये.







> "यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्।।
> तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम्।।"
> – श्रीमद्भगवद्गीता

## संवाद कौशल्ये:

आपलं म्हणणं दुसऱ्याला समजेल अशा पद्धतीने आणि प्रभावीपणे मांडता येणे म्हणजे संवाद कौशल्यं. संवाद कौशल्याचं प्रशिक्षण पुढील बाबींद्वारे दिले जाते.






> *" Who you are speaks so loudly I can't hear what you're saying."*
> *- Ralph Waldo Emerson*


## Industry 4.0 :

'इंडस्ट्री ४.०' या युगामध्ये आपण पुढे चाललो आहोत. त्यात जागतिकीकरण, प्रचंड स्पर्धा, सतत बदलणारं तंत्रज्ञान, त्या तंत्रज्ञानाचे जगभर होणारे परिणाम – सगळंच आव्हानात्मक आहे. विचारपूर्वक करिअर निवडलं नाही, तर **नजीकच्या काळात सध्या असलेल्या नोकऱ्यांपैकी ६५ टक्के नोकऱ्या नष्ट होतील** असं एक आंतरराष्ट्रीय अहवाल सांगतो. म्हणून करिअर ठरवताना, घडवताना आपल्याला या इंडस्ट्री ४.० सोबत अनेक बदलते आयाम लक्षात घ्यावे लागतील. म्हणून सध्या विद्यार्थीदशेत असलेल्यांनी नेमकं काय करायला हवं, स्वयं-अध्ययन-लवचिकता आणि सातत्यपूर्ण बहुआयामी शिक्षण कसं घ्यावं हे या कोर्समध्ये शिकवलं जातं.

#Lifelong_Learner #Artificial_Intelligence #Big_Data #Automation #Online_Courses

प्रमुख मार्गदर्शक
**डॉ. भूषण केळकर**
IIT Mumbai,
PhD in Artificial Intelligence
Author of Industry 4.0






> **"जो दुसऱ्यावरी विसंबला। त्याचा कार्यभाग बुडाला। स्वये कष्टत गेला। तोच भला।।"**
> **- समर्थ रामदास स्वामी**

## प्रतिभा विकसन:

- स्वतःची प्रतिभा वाढवणं, तिची जपणूक करणं याला आपण व्यक्तिमत्वाचा अविभाज्य घटक मानलेलं आहे.
- माणूस सवयीचा गुलाम आहे असं म्हणतात, तर मग चांगल्या सवयी लावून घेण्याचं तंत्र आपल्याला यायलाच हवं.
- एकाग्र चित्तानं काम करता येणं, टीमवर्क करता येणं, आत्मविश्वास बाळगणं अशी अनेक कौशल्यं व्यक्तिमत्व घडवण्यास मदत करतात.
- आर्थिक साक्षरता म्हणजेच Financial Literacy सारखा नवा, अतिशय महत्वाचा विषयही आपण या कोर्समध्ये शिकवतो.
- नुसती आकडेमोड करता आली म्हणजे logic वापरता येतंच असं नाही; ते जोपासायचं कसं हे आपण मुलांना शिकवतो.
- येणाऱ्या काळात नोकऱ्या घेणारे नाही, तर नोकऱ्या देणारे उद्योजक बनण्याचा दृष्टिकोन आपण विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करतो.
- आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या तज्ज्ञांनी, वर्षानुवर्षे अभ्यास करून काही कौशल्यांचं महत्व पटवून दिलं, आंतरराष्ट्रीय पातळीवर 'बेस्ट-सेलर' अशी पुस्तकं लिहिली - अशा अनेक पुस्तकांचा परिचय या कोर्समध्ये करून दिला जातो.

स्वतःच्या स्वतंत्र विचारांमध्ये नवीन संकल्पना कशा शोधून काढायच्या. प्रतिभावंत विचार केवळ कलाकारांसारख्या काही विशिष्ट लोकांनाच येतात हे अजिबात खरं नाही. स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीतून नवीन व प्रतिभावंत विचार करता येणे ही एक कला आहे. ती आम्ही शिकवतो.



आयुष्यातील तुमच्या निवडलेल्या क्षेत्रातील सर्व ज्ञान तुम्हाला असणे म्हणजे Excellence; : पण त्या ज्ञानामध्ये स्वतःच्या प्रतिभेने नवीन भर घालता येणे म्हणजे Creativity... आणि हे एकदा करून समाधान मानायचं नाही तर ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे म्हणजेचं raised to "n"! -श्री. अविनाश धर्माधिकारी सर







*Genius = (Excellence x Creativity)$^n$*

***" Everyone is a Genius. But if you judge a fish by its ability to climb a tree, it will spend its entire life thinking it is stupid."***
***- Albert Einstein***


## देश आणि देशप्रश्नांचा अभ्यास :

आपल्याला एक उत्कृष्ट व्यक्तिमत्व तर हवंच, एकविसाव्या शतकासाठी उपयुक्त कौशल्यं सुद्धा हवी– पण कशासाठी? **मायभूमीच्या सेवेसाठी** या भावनेने भारत देशाला समजून घेण्यासाठी पुढील घटकांवर सत्रं घेतले जातात. या सोबतच व्हिडिओ, माहितीपट, चित्रपट, पॉडकास्ट ह्या नव्या पिढीच्या नव्या माध्यमांतून विद्यार्थ्यांना शिकवले जाते.

#Indian_History #Indian_Polity
#Indian_Geography #Indian_Economy
#Indian_Culture

आपल्याला एक उत्कृष्ट व्यक्तिमत्व तर हवंच, एकविसाव्या शतकासाठी उपयुक्त कौशल्यं सुद्धा हवी–
पण कशासाठी?
**मायभूमीच्या सेवेसाठी**






IAS होण्यापूर्वी अविनाश धर्माधिकारी सर १० वर्षे भारत देशाचा कार्यकर्ता म्हणून काम करत होते. या दरम्यान विविध राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाच्या प्रश्नांवर त्यांनी काम केले. या विषयांवर आधारित त्यांचे गाजलेले पुस्तक 'अस्वस्थ दशकाची डायरी' याचाही ह्या कोर्समध्ये समावेश असतो.

> " देहाकडून देवाकडे जाताना देश लागतो आणि या देशाचे आपण देणे लागतो."
> -स्वातंत्र्यवीर सावरकर

# अभ्यास दौरे

## भारत दर्शन

भारताच्या विविध भागांमध्ये जाऊन तिथल्या स्वयंसेवी संस्था, स्थानिक प्रशासन यांच्यासोबत काम करून त्या भागांच्या समस्या समजावून घेण्यासाठी भारत दर्शन नावाचा अभ्यास दौरा आखला जातो.



A visit to Parliament of India and Rashtrapati Bhavan



Interaction with local political leaders at Jammu



At Bomdi la Pass, Arunachal Pradesh




Kerala Floods 2018 : Rehabilitation Contingent




At Sela Pass, Arunachal Pradesh




At India Pakistan Border Line

## National Integration Park

भारतीय सीमावर्ती भागांचे प्रश्न समजावून सांगण्यासाठी राजगडाच्या पायथ्याशी राष्ट्रीय एकात्मता उद्यान (NIP) आहे. ह्या ठिकाणाला सुद्धा आपले विद्यार्थी दरवर्षी भेट देतात.



"अभी भी जिसका खून ना खौला, वो खून नहीं पानी है।
जो देश के काम ना आए, वो बेकार जवानी है।।"
-चंद्रशेखर आझाद

## Heritage Walk

आपण जिथे राहतो, फिरतो, रोजचं आयुष्य जगतो अश्याच जागेचा वारसा आपल्याला माहीत नसतो. पुण्याचा हाच इतिहास आणि वारसा इतिहासतज्ज्ञ अजित आपटे सर विद्यार्थ्यांना त्या त्या ठिकाणी फिरवून मार्गदर्शन करत, Heritage Walk ह्या उपक्रमात सांगतात.



## CIDM (City Institute for Disaster Management), Mumbai



## पूरग्रस्तांसाठी मदतकार्य:



सांगली येथील पुरानंतरचे मदतकार्य (२०१९)



कोल्हापूर पूर पुनर्वसन (२०१९)



केरळ महापुरादरम्यान केलेलं मदतकार्य (२०१८)

## आम्ही ग्रंथोपजीवी

Reading is next to breathing – हा विचार आपण चाणक्य मंडलच्या विद्यार्थ्यांमध्ये आधीपासून रुजवला आहे.
ग्रंथावर जगणारे जीव – ग्रंथोपजीवी निर्माण करून वाचनसंस्कृती अधिक बळकट करण्याचा आम्ही प्रयत्न करतो. शिवाय, या वाचनाची सांगड देशप्रश्नांशी घालत वाचन अधिक समृद्ध होण्यास हातभार लागतो.

"वाचनाची गोडी निर्माण करणे

वाचनासाठी उत्तम पुस्तकं सुचवणे

विविध पुस्तकांची ओळख करून देणे"




#Building_Reading_Habit #Faster_Reading - Better_Reading
#Studying_through_reference_books #Writing_Skills

*" A perosn who won't read has no advantage over one who can't read.."*
*- Mark Twain*

"दिसामाजी काहीतरी ते लिहावे,
प्रसंगी अखंडित वाचीत जावे।"
- समर्थ रामदास स्वामी

# Activities

## Weekly Activities

अनुभवातून शिक्षण देण्यासाठी दर रविवारी नेतृत्व, टीम बिल्डिंग, वेळेचं व्यवस्थापन, गटचर्चा, वाद–विवाद, संभाषण कौशल्ये, प्रतिभा विकसन यासाठी विविध activities, games घेतले जातात.
ह्या activities करताना विद्यार्थी त्यांच्याच चुकांमधून शिकतात आणि स्वतःच स्वतःला घडवतात.











*" There are no defeats in life, there are only victories or lessons to be learnt."*



## गणपती काम

चाणक्य मंडल परिवारच्या फाउंडेशन कोर्सचा भाग असलेला एक विषय म्हणजे गर्दीचे व्यवस्थापन. विद्यार्थ्यांना या विषयाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा म्हणून दरवर्षी पुणे पोलिसांसोबत चाणक्य मंडल परिवार गर्दी व्यवस्थापन करते. या उपक्रमाच्या माध्यमातून भावी अधिकाऱ्यांना लोकांशी प्रत्यक्ष संवाद साधता यावा असाही उद्देश आहे.

**अनंत चतुर्दशीच्या दिवशी सलग २४ तास चाणक्य मंडलचे विद्यार्थी मिरवणुकीच्या व्यवस्थापनामध्ये सहभागी असतात. विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताकद निर्माण करणे हा याचा उद्देश असतो.**



सकाळ

# भावी अधिकाऱ्यांची अशीही 'सेवा'

## 'चाणक्य'च्या ९० विद्यार्थ्यांकडून वाहतुकीचे नियमन

पुणे, ता. ६ : गणेशोत्सवामध्ये तुम्ही शहराच्या मध्यवर्ती भागात कुठेही गेलात तरीही तुम्हाला ठिकठिकाणी वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसेल. चौकात थांबलेले, त्रस्त झालेले अन् सतत हॉर्न वाजविणारे चेहरे तुमच्या नजरेस पडल्याशिवाय राहणार नाहीत, पण तुम्ही काही प्रमुख चौक, गर्दीची ठिकाणे व मंडळांसमोर गेलात, तर तुम्हाला काही तरुण मुले-मुली अगदी हसतमुखाने चौकात थांबून इतर वाहनांना, नागरिकांना रस्ता मोकळा करून देताना दिसतील, त्यामुळे तेथे

शनिवार पेठ, पुणे : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहराच्या मध्यवर्ती भागात होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी व गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी चाणक्य मंडल परिवाराचे स्वयंसेवक विविध ठिकाणी चौकात थांबून सेवा बजावत आहेत.







## ट्रेक

### पावसाळी ट्रेक



फाउंडेशन कोर्सच्या सुरुवातीला पावसाळ्यामध्ये आपण कोरीगड येथे मुलांचा ट्रेक घेऊन जात असतो. मुलांना गडकिल्ले, त्यांचा इतिहास आणि त्यांचे संवर्धन या सर्वांबद्दल माहिती मिळावी हा या ट्रेकचा उद्देश असतो. तसेच या ट्रेक दरम्यान टीम बिल्डिंग, लीडरशिप आणि मॅनेजमेंट याच्याशी निगडित वेगवेगळ्या ऍक्टिव्हिटीज घेतल्या जातात.

### हिवाळी ट्रेक



साधारण जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात, रायगड येथे होणारा हा मुक्कामी ट्रेक म्हणजे विद्यार्थ्यांची इच्छाशक्ती किती प्रबळ आहे याचीच परीक्षा घेत असतो. या ट्रेकचा भाग म्हणून विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात.

**खिचडी स्पर्धा**





## OMP (Outdoor Management Program)

वर्गात शिकलेल्या विविध कौशल्यांचा वापर करण्यासाठी Outdoor Management Program हे निवासी शिबिर घेतले जाते.

- Team work
- Time Management
- Leadership
- Coordination
- Delegation
- Communication
- Planning
- Execution
- Resource Management
- Reporting

**याचा प्रत्यक्ष अनुभव घेता येतो.**









"सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत्।
स्वे स्वे कर्मण्यभिरत: संसिद्धि लभते नर:।।"
- श्रीमद्भगवद्गीता


# पालवी शिबीर

## पालवी दरम्यान खालील उपक्रम घेतले जातात

कोर्सचा शेवट हा विविध कालागुणांनी परिपूर्ण असलेल्या पालवी शिबिराने होतो. या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांच्या टीम्स पाडून त्यांच्यातील प्रतिभेला आणि कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात.

- कथाकथन
- व्याख्यानं
- संगीत
- नृत्यकला
- Theatre Games
- Team Work

## शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी खालील गोष्टींची ओळख करून दिली जाते



योगासन | कराटे | एरोबिक्स | ट्रेकिंग









> "युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा॥"
>
> – श्रीमद्भगवद्गीता

"प्रयत्ने वाळूचे कण रगडता तेलही गळे."

## किल्ला बांधणी


फाउंडेशन कोर्सच्या पहिल्या टर्मचा शेवट किल्ला बांधणीच्या उपक्रमाने होतो. यात विद्यार्थ्यांचे गट पाडले जातात आणि त्यांच्यावर किल्ला बांधणीची जबाबदारी सोपवली जाते. दिवाळीपूर्वीच विद्यार्थ्यांचा किल्ला बांधून पूर्ण झालेला असतो.





## Artist of the Month

विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या विविध कलागुणांना वाव मिळावा, त्यासाठी व्यासपीठ निर्माण व्हावं, म्हणून फाउंडेशन कोर्समध्ये दर महिन्याला 'आर्टिस्ट ऑफ द मंथ' ही स्पर्धा घेण्यात येते. या स्पर्धेअंतर्गत विद्यार्थ्यांना किमान तीन विषय दिले जातात. विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या कलेमार्फत हे विषय सादर करायचे असतात. चित्रकला, कविता, लेख, नृत्य, शिल्पकला अशा अनेक कलाप्रकारांतून विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होतात.



पाऊस ..

चिमुकल्या त्या जिवाच्या ओठांवराच हास्य तू..
मोराच्या त्या सुंदर हालचालीतील नृत्य तू...

शेतकऱ्याच्या कष्टातील सुखाचा तो थेंब तू..
पाना- फुलांच्या आनंदाचा कोमलसा बहर तू...

पक्षांसोबत खेळणारा लपाछुपीचा डाव तू..
सूर्य किरणांना छळणारा सप्तरंगी बान तू...

अर्थांचे अर्थ सांगणारा प्रसन्नतेचा कोष तू..
वाऱ्यासोबत झुलणारा आकाशातील मेघ तू...

मायभूमीच्या स्पंदनांचा दरवळता सुगंध तू...
गरम गरम चहा- भजी आणि वडापाव यांना आमंत्रण देणारा
सौख्याचा सागर तू...


छत्रीलाही आपल्या तालावर नाचवणारा चतुर युक्तीवान तू..
सर्वांना वेडेवाकडे रूप देऊन हसवणारा नटखट चित्रकार तू...

अनमोल ते अश्रू लपविणारी सोनेरी तिजोरी तू..
समोरील दृश्य गायब करणारा अतरंगी जादुगार तू...

धरित्रीच्या गालावरून ओघळणारा आनंद तू..
कधी कोपणारा तर कधी सुखावणारा तपस्वी तू..

अवघ्या मानवजातीचा तारणहार तू...

- श्रद्धा कालगावकर



शिक्षक / गुरू

कोणासाठी शिक्षक तर; कोणासाठी गुरु तू...
माझ्यासाठी ईश्वराच जिवंत उदाहरण तू....

सत्याची मशाल हृदयात तेवत ठेवणाराही तू .....
अज्ञानरूपी अंधारात ज्ञानाची ज्योत पेटवणाराही तू...

भरकटलेल्या मनाला मार्ग दाखवणाराही तू ....
अन् हरलेल्या मनासाठी आशेचा किरणही तू....

आयुष्याला लाभलेला ज्ञानाचा अनमोल खजिनाचं तू..
त्या खजिन्यातून सद्गुणांची रत्ने वाटणाराही तू.....

भविष्य सावरणाराही तू ....
अन् भविष्यात भरारी घेण्यासाठी पंखात बळ देणाराही तू.....

स्वप्न पहायला लावणाराही तू...
अन् त्यांना सत्यात उतरवण्याचा मार्ग दाखवणारा ही तू.....

मुर्ती घडवणाराही तू....
अन् घडलेल्या मुर्तीला ज्ञानाची वस्त्रे घालणारा ही तू...

ज्ञानाच्या बिया मनात पेराणाराही तू...
अन् कोवळ्या कोबांना सद्गुणांचा खत टाकणाराही तू....

इवल्या-इवल्याशा बंडाना अहिंसेचा तत्व पटवून देणाराही तू....
अन् वेळप्रसंगी हिंसेची वाट दाखवत बंड करायला लावणाराही तू...

तुझा चेहरा आठवताच गालांवर येणार हास्यं ही तू.....
आयुष्याला मिळालेली जणू अनमोल देणगीच तू....

भूतकाळातील जणू एक अविस्मरणीय आठवणच तू...
तुझी आठवण येताच डोळ्यातून वाहणारा अश्रू ही तू....
तूच तू आणि तूच तू....

आदि ही तू ; अन् अनंत ही तू...
तूच तू आणि तूच तू.....

------- ओम बंडगर









*"Art is an absolute medium to express the Creativity within you."*

# फाउंडेशन कोर्स का करायचा?

## फाउंडेशन कोर्स

**प्रशासनासहित जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या उत्तमता आणि प्रतिभेचा ठसा उमटवून जे भारतमातेची सेवा करतील, अशी मनुष्यशक्ती तयार करणे, हे चाणक्य मंडलचे ध्येय आहे. त्याचा पाया म्हणजेच फाउंडेशन कोर्स.**

स्पर्धापरीक्षांसहित कोणत्याही करिअरमध्ये उपयोगी अशा मूलभूत कौशल्यांच्या अभ्यासक्रमासह या कोर्समध्ये आपल्या शैक्षणिक आणि व्यावसायिक करिअरचा पाया घातला जातो, मजबूत होतो, म्हणून नाव **'फाउंडेशन'**. उद्या ज्याला प्रशासकीय अधिकारी किंवा इतर कोणत्याही जबाबदारीच्या पदांवर कामं करायची आहेत त्याच्याकडे तर्कशुद्ध आणि स्वतंत्र विचारशक्ती हवी, सारांश कौशल्य हवं, समस्या निर्मूलनाचं आणि निर्णय घेण्याचं कौशल्य हवं. प्रतिभा, नवीन चिंतन – संशोधन, बुद्धीचं मूलगामीत्व, उद्योजकता, चारित्र्यघडण ही सगळी मूल्यं जणू आज–कालच्या शिक्षणपद्धतीतून हरवली आहेत. 'फाउंडेशन कोर्स' अशाच काही कौशल्यांचं शास्त्रीय प्रशिक्षण देतो.

**Soft Skills** | **Life Skills**




## हा कोर्स कुणी करावा?

खरं तर या कोर्सला शिक्षणाची कोणतीही अट नाही. **१० वी पास किंवा वय वर्ष १६ ते वय वर्ष ३० दरम्यान असलेले विद्यार्थी या कोर्सला प्रवेश घेऊ शकतात.** या कोर्समध्ये शिकवली जाणारी विविध कौशल्ये पाहता, साधारणपणे इयत्ता ११ वीचं वर्ष किंवा पदवीचं पहिलं–दुसरं वर्ष ही हा कोर्स करण्यासाठी आदर्श वर्षं असू शकतात.

## मला पुढे स्पर्धापरीक्षा द्यायचीच आहे. त्यासाठी या कोर्सचा फायदा काय?

स्पर्धापरीक्षा देण्यासाठी अजून ज्यांना काही वर्षं आहेत, त्यांनी हा कोर्स नक्की करावा असं आम्ही आग्रहानं सुचवतो. स्पर्धापरीक्षांचा अभ्यास करत असताना विविध विषयांचा अभ्यास करावा लागतो. विविध संदर्भग्रंथ वाचावे लागतात. हे करत असताना **वेळेच्या नियोजनाला अगणित महत्व आहे.** अशा परीक्षा देत असताना **मानसिक संतुलन** राखणं फार महत्वाचं आहे. समाजात घडणाऱ्या घटना समजून घेत, त्याचा खोलात जाऊन अभ्यास करणं आणि त्यावर मत बनवणं, यासाठी खास तयारीची आवश्यकता असते. आधुनिक जगात, झपाट्यानं बदलणाऱ्या तंत्रज्ञानाशी मैत्री करत, **अभ्यासाचं तंत्रज्ञान** अधिक सुलभ करता येऊ शकतं, याबद्दल आम्हाला विश्वास आहे. वरील सर्व आणि इतरही अनेक कौशल्ये फाउंडेशन कोर्समध्ये शिकवली जातात.

MPSC

सत्यमेव जयते
UPSC

## फाउंडेशन कोर्सची रचना:

| | पुणे | मुंबई |
|---|---|---|
| सुरुवात | 14 जुलै 2024 | 13 जुलै 2024 |
| एकूण सत्रे | 130+ | 130+ |
| आठवड्याला | 5 सत्रे | 4 सत्रे |
| तास कसे होतील? | आठवड्यातील 6 दिवस<br>वेळ: सायं. 6 ते 8 | आठवड्यातील 3 दिवस<br>शुक्रवार, शनिवार - सायं 6.30 ते 8.30<br>रविवार - सकाळी 9 ते 11<br>आणि 11.30 ते दू. 1.30 |
| तासांचं स्वरूप? | Offline + Online माध्यमात | Offline + Online माध्यमात |
| Fees | 60,000 रु. ( GST सहित )<br>One Time Lumpsum भरल्यास<br>10000 रुपयांची सवलत मिळेल | |



## वर्षभराच्या Foundation Course (Regular) ची वैशिष्ट्ये:

- नव्या, Exclusive मोड्यूल्सचा समावेश
- कॉलेजचे वेळापत्रक सांभाळून हा कोर्स करता येणार
- विविध क्षेत्रातील तज्ज्ञांची जास्त सत्रे
- प्रत्येक मोड्यूल जास्त सत्रांमध्ये विस्तृत, सर्वसमावेशक पद्धतीने शिकवले जाणार
- तासांमध्ये दिलेल्या activities पूर्ण करण्यासाठी भरपूर वेळ मिळणार.

## Offline Activities म्हणजे नक्की काय?

वर्गात जी कौशल्यं आम्ही विद्यार्थ्यांना शिकवतो, ती त्यांना प्रत्यक्षात वापरण्याची संधी मिळाली तर शिक्षण प्रक्रिया अधिक समृद्ध होते, असा आमचा अनुभव आहे. म्हणून दर आठवड्याला आम्ही विद्यार्थ्यांसाठी विविध खेळ आयोजित करतो. या खेळांमधून विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण, 'टीम प्लेयर' मनोवृत्ती, संयम ठेवणे, विचार प्रक्रिया सुधारणे अशा गुणांचा विकास होतो. व्यक्तिमत्वातल्या कोणत्या भागावर काम करायची गरज आहे, याचं उत्तर या खेळांमधून विद्यार्थ्यांना मिळतं.



## तास कोणत्या भाषेत होतील?

फाउंडेशन कोर्स हा मुख्यतः मराठीत चालतो. आवश्यक तिथे इंग्रजी शब्दांचा उल्लेख केला जातो. करिअरच्या कोणत्याही क्षेत्रात उत्तम आणि प्रतिभावंत होण्यासाठी आपल्या मातृभाषेवर प्रभुत्व असणे, हे शिक्षण क्षेत्रात जगभरात स्वीकारलेले महत्वाचे सूत्र आहे. चाणक्य मंडलमध्येही आपण हे सूत्र स्वीकारतो.

"कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि॥"
- श्रीमद्भगवद्गीता

# मागच्या वर्षी कोर्स केलेले विद्यार्थी म्हणतात..



मी फाउंडेशन कोर्समुळे बोलका झालो. मैत्री करायला स्वतःहून प्रयत्न करायला लागलो. प्रश्न असल्यास विचारायला सुरुवात केली. आत्मविश्वास वाढला. ठरवलेल्या वेळापत्रकांनुसार कामं कारायला लागलो. माझ्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल झाले. 'स्व' च्या ओळखीचा सुरु झालेला प्रवास म्हणजे फाउंडेशन कोर्स.

★★★★★ **-करण नरोटे**
(सदाशिव पेठ, २०२२-२३)



यहा की संस्कृति यह है कि सभी अध्यापकों को 'दादा 'और' ताई ' कह के बुलाया जाता है, ताकि छात्रों को उनके साथ संवाद करते समय सहज बनाया जा सके। सबसे महत्वपूर्ण बात जो मैने यह सीखी वह है दूसरो को राय सुनना और उनके दृष्किोण को समझना।

★★★★★ **-अक्सा गोरमे**
(सदाशिव पेठ, २०२२-२३)



अधिकारी(कुठल्याही क्षेत्रातील) कसं व्हावं हे शिकणे सोपे होते जेव्हा कसा अधिकारी व्हायचं आहे हे माहित असतं. ते कळण्यासाठी मला फाउंडेशन कोर्स ने मदत केली. Humour, financial literacy, observation skills, management skills आयुष्यात आणण्याच्या प्रवासाची सुरुवात झाली. फाउंडेशन कोर्समुळे काही सुंदर तत्वं व नाती जोडली गेली. फाउंडेशन हा फक्त करायचा नाही तर जगायचा कोर्स आहे.

★★★★★ **-अपेक्षा काळे**
(सदाशिव पेठ, २०२२-२३)



I am lucky to have experienced Foundation Course at the right period in my life. I enjoyed the course a lot as it gave me a great amount of exposure and widened the horizons of my thoughts. Now I have more than a few good habits and my capability to strive on the path towards Knowledge of The Self ("Swa Chi Olakh") has clearly enhanced, for which I am forever grateful.

★★★★★ **-Nilay Sahastrabuddhe**
(Warje, 2022-23)

# मागच्या वर्षी कोर्स केलेले विद्यार्थी म्हणतात..



You never know when Foundation Course becomes an integral part of your life. The skills taught in the course are exposed in a new form at each stage. When our life is surrounded by many challenges, Foundation Course works to give us a perspective through many mediums.The process of self-transformation through many activities is innovatively done in the Foundation Course.

★★★★★ **Vedant Kulkarni**
**(2021-22 Sadashiv Peth center)**



ह्या कोर्सच्या नावातच सारं काही दडलेलं आहे. जसे एखाद्या इमारतीची मजबुती तिच्या पायाभरणीवरून ठरते त्याचप्रमाणे यशस्वी जीवन जगण्यासाठीची पायाभरणी या कोर्सद्वारे पूर्ण होताना दिसते. आपल्या आयुष्यात अभ्यासासोबत सांगड लागते ती विविध कौशल्यांची ज्यामुळे सुरु होतो 'स्व' च्या ओळखीचा प्रवास. हा कोर्स आयुष्याच्या वाटेत आनंदाची शिदोरी आहे, जी शिकवते - Do what you enjoy the most; but if you can't, then Learn to Enjoy What You are Doing.

★★★★★ **मानसी काळे**
**(2021-22 सदाशिव पेठ)**



सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासोबतच नकळत स्वतःच्या अनेक सुप्त क्षमतांची जाणीव करून देऊन, त्यांवर काम करायला सकारात्मक प्रेरणा देणारा हा कोर्स आहे. स्वतःची स्वतः ला विविध अंगांनी ओळख करून देणारा, प्रत्येकाने करावा असा हा कोर्स....!

★★★★★ **ऋषिकेश घोडके**
**(2021-22 सदाशिव पेठ)**



माझ्या आयुष्यातील कधीच न विसरणार कोर्स म्हणजे फाऊंडेशन कोर्स.

या कोर्समुळे मी स्वतःकडे वेगळ्या दृष्टिकोनातून बघायला शिकलो आणि समृद्ध होत गेलो.

★★★★★ **रोहन ढमाले**
**(2021-22 वारजे)**

## प्रतिभेस मस्तीत आकार यावे...

१९९६ पासून चाणक्य मंडल परिवारमध्ये फाऊंडेशन कोर्स सुरू आहे. गेल्या २६ वर्षांत फाऊंडेशन कोर्सचे विद्यार्थी स्पर्धा परिक्षांसोबत जीवनातील विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी झालेले आहेत. विशाल सोळंकी सर (IAS, 2008), हृषिकेश मोडक सर (IAS, 2008), वैभव निंबाळकर सर (IPS, 2009), विश्वांजली गायकवाड मॅडम (IFS 2017), आरती कुलकर्णी मॅडम (पत्रकार), सागर पालकर सर (एव्हरेस्टवीर), निखिल फराटे सर (नायब तहसीलदार, 2020) अशा वेगवेगळ्या क्षेत्रात फाउंडेशन कोर्स केलेल्या विद्यार्थ्यांनी आपला ठसा उमटविला आहे.



I did my Foundation Course in Personality Development at Chanakya Mandal in the year 1999 when I was in First Year of Senior College. I still vividly remember Dharmadhikari Sir's inspiring talks, values learnt during various activities, skills imbibed during summer camp while having great fun during the entire course, making it unique in itself. Emphasis given on knowing oneself and character building while achieving excellence and creativity in chosen walk of life are not only useful for those pursuing civil services' examinations but also other careers. This course will surely help our young minds to get ignited and blossom to their fullest potential."

★★★★★ **-Vishal Solanki**
**IAS**



I was a foundation course student in 1997. Looking back now, I feel that the course, was instrumental in giving me direction for future. Dharmadhikari sir's weekly sessions were high point of the course. Even after 25 years, imprint of those sessions are Still fresh on my mind.

★★★★★ **-Hrishikesh Modak**
**IAS**






आयुष्याच्या मोक्याच्या, जडणघडणीच्या काळात मला चाणक्य मंडल परिवाराचा फाउंडेशन कोर्स मिळाला. त्याचा प्रशासकीय सेवेचे ध्येय ठरवताना, त्यासाठी तयारी करत असताना ते आता प्रशासनात काम करत असताना पदोपदी फायदा जाणवतो आहे. या कोर्समध्ये शिकवले गेलेले अनेक विषय जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी उपयुक्त आहेत

★★★★★ **-Vaibhav Nimbalkar**
**IPS**

## प्रतिभेस मस्तीत आकार यावे...



'जे करीन ते उत्तम करीन!' हा अविनाश धर्माधिकारी सरांनी दिलेला मंत्र मला कायम जगण्याची वाट दाखवतो. तुम्ही जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात जा... त्यासाठी आवश्यक ती सगळी कौशल्यं चाणक्य मंडलच्या फाउंडेशन कोर्समध्ये शिकायला मिळतात. मी चाणक्य मंडलच्या पहिल्या बॅचची विद्यार्थिनी आहे. इथेच मला पत्रकारितेची वाट सापडली. माझ्या पर्यावरण संवर्धनातल्या कामाची सुरुवातही याच कोर्समधल्या एका सत्रामुळे झाली हे अभिमानाने सांगावंसं वाटतं. त्यामुळेच चाणक्य मंडल हे माझं विद्यापीठ आहे. 'प्रतिभेस मस्तीत आकार यावे, उरी उत्तमाचेच ओंकार गावे ...' ही प्रार्थना माझ्या कानात सतत निनादत असते!

**-आरती कुलकर्णी (पत्रकार)**
**रामनाथ गोएंका पुरस्कार**



Having come out raw after the matriculation and soon being a part of the Foundation Course indeed helped me develop the overall aspect of my personality. The activities and experiences of the course enriched my understanding of the outside world. The multidimensional design including fun and knowledge activities of the Course leaves no basket of learnings unturned. 13 years down the line, today I owe some of my attributes directly to the experiences in my Foundation Course in 2011.

**-Madhuri Garud**
**IRS 2020**



मी सागर पालकर, चाणक्य मंडलच्या फ़ाउंडेशन कोर्सचा 2001-02 बॅचचा विद्यार्थी आहे. एक गिर्यारोहक, एव्हरेस्टवीर अशी माझी ओळख निर्माण करण्यात चाणक्य मंडलचा खूप मोठा वाटा आहे. आपल्याला जे आवडेल, पटेल असं क्षेत्र निवडायचं आणि त्यात टॉप वर जायचं हे धर्माधिकारी सरांच वाक्य आणि भान राखून योजना आखाव्यात आणि बेभान होऊन अमलात आणाव्यात या बाम सरांच्या वाक्याने माझ्या आयुष्याला एक नवी दिशा मिळाली. सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

**-सागर पालकर (एव्हरेस्टवीर, मॅनेजमेंट ट्रेनर)**



2009 चा व्यक्तिमत्व विकसनाचा कोर्स म्हणजे फाउंडेशन कोर्स करताना ग्रामीण भागातील असणं म्हणजे कमीपणाचं नसून तो तुमचा 'PlusPoint' आहे हे माझ्या लक्षात आलं आणि स्वतःबद्दल बघण्याचा माझा दृष्टिकोन विकसित होत गेला. माझ्या Weaknesses ना माझ्या Strength मध्ये बदलू शकलो ते फक्त चाणक्य मंडलच्या फाउंडेशन कोर्समुळे. माझ्या आयुष्यात मी जे काही मिळवलं त्यामध्ये चाणक्य मंडलचा मोलाचा वाटा आहे आणि त्याबद्दल मी कायम ऋणी असेन.

**-निखिल फराटे (नायब तहसीलदार)**

# फाउंडेशन कोर्सवर तास घेणारा आमचा अनुभवी प्राध्यापक वर्ग



**श्री. अविनाश धर्माधिकारी**
माजी सनदी अधिकारी,
संस्थापक -संचालक, चाणक्य मंडल परिवार



**सौ. पूर्णा धर्माधिकारी**
Trustee, Secretary
चाणक्य मंडल परिवार



**डॉ. भूषण केळकर**
IIT मुंबई, PhD in
Artificial Intelligence



**श्री. अजित आपटे**
लेखक, शिवाजी महाराजांच्या
प्रशासनाचे गाढे अभ्यासक



**मेजर रेणू गोरे**
भारतीय लष्करात १० वर्षे अधिकारी
म्हणून कार्य, मेजर म्हणून निवृत्त



**श्री. सारंग गोसावी**
'असीम फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेचे
संस्थापक अध्यक्ष, भारताच्या सीमावर्ती
राज्यांमध्ये कार्यरत



**सौ. संजीवनी अत्रे**
ग्रंथपाल - पुणे मराठी ग्रंथालय,
लेखिका, लेखन आणि वाचन
कौशल्यांवर कार्यशाळा घेतात



**सौ. रोहिणी गुट्टे-नागणे**
Trustee, चाणक्य मंडल परिवार
M.Sc. Biotechnology
Selected नायब तहसीलदार



**ॲड. सिद्धार्थ धर्माधिकारी**
BSL LLB, LLM
Trustee, चाणक्य मंडल परिवार



**श्री. स्वप्नील मुंगळे**
BE ENTC,
CEO, चाणक्य मंडल परिवार



**श्री. अभिजित शिंदे**
BE Computer Engineering,
भारतीय राज्यघटना, राजकारण आणि
कायदे पुस्तकाचे लेखक



**श्री. मयूर पाटील**
BE Mechanical Engineering,
UPSC Interview 2020

## फाउंडेशन कोर्सवर तास घेणारा आमचा अनुभवी प्राध्यापक वर्ग



**श्री. केतन सांडे**
BE Civil Engineering
Masters in Management Studies (Finance)



**श्री. कमलेश सोनावणे**
Psychologist & CEO, Anhad LLP



**श्री. पंकज येलपले**
BE Computer, सहाय्यक संपादक, चाणक्य मंडल स्पर्धापरीक्षा तयारी मासिक



**श्री. सौरभ तोरवणे**
B.A. History
M.A. History
Perusing PhD. in History at Pune University



**श्री. ज्ञानेश्वर तिडके**
B.E. Mechanical Engineering
Masters in History



**श्री. सागर पालकर**
Mountaineer, 2012 मध्ये Mount Everest सर केला

**And many more expert faculties take lectures on Foundation Course**

**चाणक्य मंडलच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे सत्र बघण्यासाठी सोबत दिलेला QR Code Scan करा**

Do visit our YouTube channel
**'Chanakya Mandal Pariwar'**
for video lectures and updates



# चाणक्य मंडल परिवारची भव्य वारजे वास्तू



Mumbai (Sion) Center



Sadashiv Peth Center



Sadashiv Peth Center



Warje Center



Warje Center



Chhatrapati Sambhajinagar Center



## Be a part of this Foundation Course Family...

### ॲडमिशन घेण्यासाठी खालील नंबरवर संपर्क करा.

**पुणे मुख्यालय :**

कार्यालय: 1557 सदाशिव पेठ ,नवी पेठ विठ्ठल मंदिराजवळ, पुणे 411030.
फोन: 080-69015453/55

**वारजे केंद्र :**

कात्रज – देहूरोड हायवेवरील वारजे उड्डानपुलाजवळ, माई मंगेशकर रुग्णालयाजवळ मागील बाजूस, सिप्ला फाउंडेशन रस्त्यावर, वारजे, पुणे 411052.
फोन: 080-69015453/55

**मुंबई केंद्र:**

डि. एस. हायस्कूल, गुरुकृपा हॉटेल जवळ, शिव (प.), मुंबई 400022.
फोन: 080-69015454/18

**छत्रपती संभाजीनगर केंद्र** – चौधरी चेंबर्स, रॉक्सी टॉकिजच्या बाजूला, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासमोर, छत्रपती संभाजीनगर.
फोन: 080-69015420

ई–मेल: office@chanakyamandal.org

For More Information Visit Our Website
**www.chanakyamandal.org**

Follow us on :

## चाणक्य मंडल परिवारची उपासना

हरि: ॐ ॐ ॐ
ॐ सह नाववतु सह नौ भुनक्तु सहवीर्यं करवावहै
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै
ॐ शांति: शांति: शांति:
ॐ ॐ ॐ
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवोमहेश्वर:
गुरु: साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम:
ॐ ॐ ॐ
सर्वेऽत्र सुखिन: सन्तु सर्वेसन्तु निरामया:
सर्वेभद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दु:खमाप्नुयात्
ॐ तत् सद्, ॐ तत् सद्, ॐ तत् सद्
ॐ शांति: शांति: शांति:

## उपासनेचा अर्थ

**पहिला श्लोक** : आम्ही सर्व एक असू. आहारापासून ते पराक्रमापर्यंत सर्व बाबी आम्ही एकत्रितपणे करू. तेजस्वीपणाने अध्ययन करू. आम्ही एकमेकांचा द्वेष करणार नाही.

**दुसरा श्लोक** : गुरु हा ब्रह्मदेव आहे (निर्माता), गुरु हा विष्णू आहे (पालनकर्ता), गुरु हा भगवान शंकर (संहारक) आहे. गुरु म्हणजेच साक्षात् परब्रह्म आहे. अशा या गुरुला माझा नमस्कार असो..

**तिसरा श्लोक** : या भूतलावरचे सर्वच जण सुखी होवोत, सर्वजण निरोगी राहोत, सगळ्यांचे कल्याण होवो, इथे कुणीही दुःखी राहू नये.

## चाणक्य मंडल परिवारची प्रार्थना

नव्या वैभवाचीच स्वप्ने सजावी
मनी हास्य लेऊन मुक्ती जगावी
हवी फक्त उन्मुक्त निर्माणशक्ती
नवी ध्येयआसक्त प्रल्हाद भक्ती

अहंता गळावी अभंगास म्हणता
तपस्येत तल्लीन आतून होता
प्रतिभेस मस्तीत आकार यावे
उरी उत्तमाचेच ओंकार गावे

जरी एक अश्रू पुसायास आला
तरी जन्म काहीच कामास आला
जरी अश्रु विस्फोट होऊनि सजला
तरी मुक्त ज्वालामुखी जन्म झाला

## प्रार्थनेचा अर्थ

श्री. अविनाश धर्माधिकारी ज्यावेळी IAS साठी निवडले गेले त्यावेळी त्यांनी स्वत:साठी लिहिलेले एक काव्य आहे. आपण कशा प्रकारचे अधिकारी व्हायचे, थोडक्यात 'कार्यकर्ता अधिकारी' असे स्वत:लाच सांगणारी ती कविता आहे. त्या मूळ कवितेचेच थोडे बदललेले रूप म्हणजे चाणक्य मंडल परिवारची ही प्रार्थना आहे.

**पहिले कडवे :** ऐहिक, मानसिक, बौद्धिक आणि अर्थातच आध्यात्मिक सुद्धा... नव्या वैभवाची स्वप्ने आपण साकार करूया. जगापासून फटकून राहणारी वाकड्या तोंडाची नव्हे, तर मनात हास्य ल्यालेली तृप्त अशी मुक्ती जगूया. सर्व साखळ्या गळून पडलेली प्रतिभासंपन्न अशी उत्फुल्ल नवनिर्मिती आपल्या हातून घडावी. भक्त प्रल्हादाची जी अढळ निश्चयशक्ती होती, ती आपल्यात यावी, म्हणजे आपण आपले ध्येय गाठू शकू.

**दुसरे कडवे :** आपापल्या आयुष्यात जे काही बनण्याचा आपला निश्चय झाला आहे, त्या साधनेतले आपण सर्वजण साधक आहोत. मग ही साधना करताना आपला अहंकार सहजगत्या गळून पडावा. ज्ञानतपस्या करताना आपण नम्र होऊन त्यात तल्लीन होऊन जाऊया. 'मी जे काही करीन ते उत्तम आणि प्रतिभासंपन्न करीन' असेच स्वत:ला सांगत (ॐ कार गात) आपण ही साधना करूया. 'मस्ती' चे अर्थ दोन्ही : तल्लीन होत आणि तारुण्य सुलभ सर्व प्रकारची धमाल करत... तरीही या सर्वांतून विधायक नवनिर्मितीची आस बाळगणे.

**तिसरे कडवे :** दु:खितांचा एक अश्रू जरी आपण पुसू शकलो तरी जीवन धन्य झाले असे जरूर मानूया. पण केवळ अश्रू पुसणे पुरेसे नाही. (ते पुन्हा वाहतील आणि पुसायला कुणीतरी दुसरा येण्याची वाटही पाहायला शिकतील.) दु:खामागच्या कारणाशी संघर्ष करण्याची शक्ती जर आपण त्यांच्यात निर्माण करू शकलो (माणसांचे सबलीकरण), म्हणजेच तो विस्फोट जर आपण घडवून आणू शकलो तर त्या विस्फोटक अश्रूंतूनच उद्याच्या निर्मितीक्षम ऊर्जेच्या ज्वालामुखीचा उद्रेक होईल. असा उद्रेक व्हावा यासाठी आपण आज त्यांचे अश्रू पुसायचे आहेत.